महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 19 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 235 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# किसन कथोरे योग्यवेळी मंत्री होतील - देवेंद्र फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** कुळगांव बदलापूर नगर परिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे उद्धाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिवजयंतीच्या एक दिवस आधीच मंगळवार 18 फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीन वाजता करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त अशितोष डुंबरे, कुळगांव बदलापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड आदी उपस्थित होते. आमदार किसन कथोरे यांच्या संकल्पनेतून हा पुतळा उभारण्यात आला आहे. उल्हास नदीच्या काठावर प्रशस्त चौकात उभारण्यात आलेल्या या पुतळयामुळे बदलापूर पश्चिमेकडील भागाला एक वेगळाच महत्व यामुळे प्राप्त झाले आहे. पुतळयाच्या अवतीभवती दगडी चिरा उभारून तटबंदी करण्यात आली आहे. तसेच या ठिकाणी बसण्यासाठी आसन व्यवस्था ही करण्यात आली आहे. या पुतळयाच्या अनावरणा प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श ठेवून आम्ही महाराष्ट्रात राज्य करत आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही महिलांचा मान सन्मान ठेवण्यात येत होता. आम्ही देखील आमच्या माता-भगिनींचा योग्य तो सन्मान ठेवत असून त्यांचा आदर्श आम्ही आमच्या समोर ठेवला असल्याचे देवेंद्र फडणवीस या अनावर प्रसंगी म्हणाले. तसेच शिवजयंतीच्या एक दिवस आधीच महाराजांच्या पुतळयाचं अनावरण करण्याचं सौभाग्य मला मिळाल्याबद्दल त्यांनी आमदार किसन कथोरे आणि कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे आभार व्यक्त केले.

पुतळा अनावरण प्रसंगी कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा स्वागत केलं.



## थोडक्यात महत्वाचे

### गट तटाचे राजकारण सहन केले जाणार नाही

*- शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे*

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना मध्यवर्ती कार्यालय मुरबाड येथे कल्याण मुरबाड विधानसभा जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड शहर आणि तालुका आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी अरविंद मोरे यांनी आपल्या भाषणात मुरबाड मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तसेच संपूर्ण महाराष्ट्र मध्ये जोरदार इन्कमिंग सुरू झाली असून मुरबाड मध्ये सुद्धा फक्त बेरजेच राजकारण सुरू असून लवकरच अनेक पक्षाचे पदाधिकारी प्रवेश करतील असे प्रतिपादन केले. गट तटाचे राजकारण सहन केले जाणार नाही असे परखड मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी अनेक पदाधिकारी यांना पदे देण्यात आली. तसेच मुरबाड तालुक्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक गीते, नवनिर्वाचित नगरअध्यक्ष संतोष चौधरी तसेच मुरबाड आगार व्यवस्थापक यांच्या बरोबर आगारातील बस सेवा कल्याण मुरबाड फेरी वाढविणे बाबत चर्चा करण्यात आली. यावेळी शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### आव्हाडांचे दोन खंदे समर्थक अजित पवारांच्या राष्ट्रवादीत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे नेते व कळवा मुंब्रा मतदार संघाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचे निकटवर्तीय अभिजित पवार आणि हेमंत वाणी यांच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी मुंबईत अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला. या पक्ष प्रवेशाच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार आव्हाड यांना धक्का दिल्याची चर्चा रंगली आहे. कळवा मुंब्रा हा परिसर आमदार जितेंद्र आव्हाड यांचा बालेकिल्ला मानला जातो. या मतदार संघातील खारेगाव परिसरातून अभिजित पवार हे महापालिकेची निवडणूक लढण्याची तयारी गेल्या काही वर्षांपासून करीत आहेत. त्यांनी जितेंद्र आव्हाड यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम केले असून आव्हाड यांचा निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख होती. त्याचबरोबर ठाणे शहरातील खोपट परिसरातून हेमंत वाणी आणि त्यांची पत्नी सीमा वाणी हे महापालिकेची निवडणूक लढण्याची तयारी करीत आहेत. ते सुद्धा आव्हाड यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. आव्हाड यांच्यावर टीका करणाऱ्यांना मारहाण केल्याचाही त्यांच्यावर आरोप असून या मारहाण प्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यानंतर दोघांवर तडीपारची कारवाई करण्यात आली होती. राष्ट्रवादी पक्षातील फुटीनंतर ठाण्यात दोन गट पडले. शहराध्यक्ष आनंद परांजपे आणि माजी नगरसेवक नजीब मुल्ला यांनी आव्हाड यांना रामराम करत अजित पवार यांना साथ दिली होती. त्यावेळीही अभिजित पवार आणि हेमंत वाणी हे दोघे आव्हाड यांच्यासोबत उभे राहिले होते. मुल्ला यांनी आव्हाड यांच्याविरोधात विधानसभेची निवडणूक लढवली होती. त्यात त्यांचा पराभव झाला होता. या निवडणूकीतही अभिजित पवार आणि हेमंत वाणी हे दोघे आव्हाड यांचे काम केले होते. या दोन्ही खंद्या समर्थकांनी आव्हाड यांना रामराम ठोकत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत मंगळवारी पक्ष प्रवेश केला.

# शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवा खा. श्रीकांत शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दि. १८ ठाणे :** जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे अध्यक्षतेखाली आज, दि. १८ फेब्रुवारी, २०२५ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक संपन्न झाली. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव अशोक शिनगारे यांनी जिल्हा प्रशासन संदर्भातील कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी मोलाची भूमिका बजावणार असल्याचे प्रास्ताविकात सांगितले.



जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने जिल्ह्याचा विकास करण्यासाठी दिशा समिती बैठक आयोजित करण्यात आली असून योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी ही बैठक महत्त्वाची आहे. केंद्र सरकारच्या अंतर्गत राबविणाऱ्या योजना विविध विभागांना दर्जेदार पायाभूत सुविधांची कामे सुनिश्चित करून आणि योजना त्यांच्या इच्छित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतील याची खात्री करण्याचे आवाहन खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत भिवंडी व उल्हासनगर शहरांमध्ये स्वच्छते संदर्भात कामकाज करण्यासाठी आराखडा तयार करून आणि निश्चित केलेल्या कालावधीत कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या. यावेळी खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती नरेश गणपत म्हस्के, खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती बाळ्या मामा - सुरेश गोपीनाथ म्हात्रे, विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे, विधानसभा सदस्य डॉ. बालाजी किणीकर, आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका डॉ. इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अतिरिक्त आयुक्त ठाणे महानगरपालिका प्रशांत रोडे, आयुक्त मीरा भाईंदर महानगरपालिका (प्रभारी) अनिलकुमार पवार, आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका मनिषा आव्हाळे, आयुक्त भिवंडी निजामपूर महानगरपालिका अनमोल सागर, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी तसेच संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

# देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते बदलापुरात छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : विधानसभेत सलग पाच वेळा निवडून आलेले आमदार किसन कथोरे हे योग्य वळी मंत्री होतीलअसा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बदलापूर येथील जाहीर सभेत दिला. किसन कथोरे यांचा अनुभव दांडगा असून एखाद्या मंत्रापेक्षा ही त्यांचं कार्य मोठं असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बदलापूर येथे काढले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयाच्या अनावरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बदलापूर येथे आले होते. यावेळी देवेंद्र फडणवीस यांचा लाडक्या बहिणींच्या हस्ते जाहीर सत्कारही करण्यात आला. त्यानिमित्ताने घेतलेल्या सभेत देवेंद्र फडणवीस बोलत होते. गेल्या पाच वर्षात विकासाचे मोठे प्रकल्प अडकून राहिल्याची खंत आमदार किसन कथोरे यांनी आपल्या प्रास्ताविकात व्यक्त केली. अनेक महत्त्वकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर



केले. यात उल्हास नदीचे संवर्धन, रेडलाईन आणि ब्ल्यू लाईन रेषेत चा विषय, तसेच बदलापूर नगरपालिकेसाठी वाढीव पाणीपुरवठा योजना आणि मेट्रो प्रकल्पाला गती या विषयांना मुख्यमंत्र्यांनी अधिक गती द्यावी अशी मागणी आमदार किसन कथोरे यांनी आपल्या प्रास्ताविकात केली. हाच धागा पकडत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात आमदार किसन कथोरे यांच्या कार्याचा गौरव केला. आमदार किसन कथोरे यांना मंत्री करावं अशी मागणी भाजपच्या आजी-माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे या कार्यक्रमादरम्यान केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मी आमदार किसन कथोरे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा असून योग्य वेळी किसन कथोरे हे मंत्री होतील असा शब्द त्यांनी यावेळेस दिला. तसेच मेट्रोच्या कामाला गती देण्यासाठीही आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. बदलापूर शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेस संदर्भात तातडीने पावले उचलून त्याला मंजुरी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमादरम्यान केली. लाडक्या बहिणींच्या हस्ते ठाणे जिल्ह्यात झालेल्या सत्कार यबद्दल त्यांनी लाडक्या बहिणींचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाला आमदार निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, कुमार आयलानी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

# आंबिवली - मुरबाड रेल्वेचा मार्ग खडतर !

## प्रस्तावित मार्ग रद्द होणार ? रायते यथे ब्रिजचा अडथळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण मुरबाड रेल्वे, आंबिवली ते मुरबाड अशी मंजूर झाली या मार्गाचा प्रारंभीक सर्व्हे केला त्या प्रमाणे रेल्वे मार्ग भू संपादन गॅजेट प्रसिद्ध झाले. मात्र रायते येथील बडोदारा मार्गाचा अडथळयामुळे हा मार्ग रखडला त्यानंतर पुन्हा बदल करून रायते मानिवली येथील या मार्गाची नव्याने रचना केली गेली.त्यास मानिवली येथील शेतकऱ्यांचा विरोध असल्याने भू संपादन प्रक्रिया राखडली. याच रेल्वे मार्गास रायते येथील उल्हास नदीवरील नवीन पूल नवा अडथळा बनला आहे. येथील पुलाचे कॉलम व खांब त्यांची उंची यामुळे प्रस्तावित रेल्वे मार्ग पुन्हा रखडणार आहे.

या रल्वे मार्गासाठी मंजूर 700 कोटी निधी देखील परत जाणार आहे. 14 फेब्रुवारी 2025 पर्यत या रेल्वे मार्गासाठी च्या प्रस्तावित मार्गातील वन विभाग. पर्यावरण विभाग, तसेच अन्य आवश्यक विभागाचे परवाने मिळणे आवश्यक होते. भूमी अभिलेख विभागाचा भुसपादन अहवाल मिळणे आवश्यक होता. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचा अहवाल आवश्यक होता. या रेल्वे मार्गाचा एक ही अहवाल 14 फेब्रुवारी 2025 पर्यत आलेले नाहीत. त्यामुळे हा रेल्वे मार्ग प्रस्ताव खारीत जाईल अशी प्रतिक्रिया रेल्वे चे अधिकारीच देत आहेत. या मार्गासाठी 700 कोटी निधी मंजूर केला होता.तो निधी अपुरा आहे असे रेल्वे प्रशासनाचे म्हणणे आहे. हा रेल्वे मार्ग चुकीचाच मुळात कल्याण मुरबाड रेल्वे बाबत योग्य पाठपुरावा व योग्य नियोजन नसल्याने प्रारंभी पासूनच हा मार्ग वादातीत झाला होता. फेब्रुवारी 2019 मध्ये या मार्गाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांच्या हस्ते

**कल्याण मुरबाड रेल्वे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी अभ्यास पूर्ण प्रयत्न करेन, रेल्वे मंत्र्याची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लागावा यासाठी पाठपुरावा असेल खासदार बाळ्या मामा म्हात्रे.कल्याण मुरबाड रेल्वे व्हावी ही माझी प्रामाणिक इच्छा आहे. त्यासाठी टिटवाळा येथून मुरबाड साठी रेल्वेमार्ग कसा होईल याची पाहणी करून हा मार्ग मार्गी लावू**

**- आमदार किसन कथोरे**

नवीन मार्ग घोषित केला गेला.तो मार्ग विठ्ठलवाडी ते मुरबाड असा होता. त्यानंतर आंबिवली ते मुरबाड रेल्वे मार्ग मंजूर झाला. या पूर्वी या रेल्वे मार्गाचे चार सर्व्हे करण्यात आलेले आहेत. त्यात हा पाचवा असेच आता म्हणावे लागेल.

या रेल्वे मार्गमुळे अनेक जन कर्जबाजरी झाले आंबिवली ते मुरबाड प्रस्तापित रेल्वे मार्गांवर सहाशे हुन अधिक शेड बांधले गेले त्यासाठी करोडो रुपये अनेकांनी गुंतवले या सर्वांची घोर निराशा झाली. कल्याण मुरबाड तालुक्यातील नागरिकांच्या भावनांशी जोडलेला हा रेल्वे मार्ग आहे. तो होणे गरजेचे आहे. मात्र त्या मार्गाचे राजकारणच अधिक झाले. आता हा मार्ग पुन्हा रद्द होईल नवीन रेल्वे मार्गाचे काय? असा प्रश्न स्थानिकांचा आहे. निवडणुका आणि मतांसाठी विकासाचे प्रकल्प फक्त चर्चा म्हणून मुरबाडकर आजून किती काळ ऐकणार.

# स्मार्ट गव्हर्नन्ससाठी केडीएमसीला SKOCH म्युनिसिपल गोल्ड पुरस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये सन २००२ पासून ई-गव्हर्नन्स प्रणाली कार्यान्वीत असून विविध पुरस्कारांसोबत सर्वोत्कृष्ट ई-गव्हर्नन्स सोल्यूशन म्हणून सन २००४ आणि सन २०११ मध्ये SKOCH ग्रुपतर्फे पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

अशाच प्रकारे स्मार्ट गव्हर्नन्स क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी प्रतिष्ठित SKOCH म्युनिसिपल गोल्ड पुरस्कार 15 फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली येथे SKOCH ग्रुपचे अध्यक्ष समीर कोचर यांच्या हस्ते महापालिकेस प्रदान करण्यात आला. हा सन्मान महापालिका आयुक्त डॉ इंदू राणी जाखड यांनी स्वीकारला. महापालिकेच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा मिळत आहेत. डिजिटल गव्हर्नन्स आणि स्मार्ट सेवा - एक महत्त्वपूर्ण पाऊल या उपक्रमाच्या माध्यमातून डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन व सार्वजनिक सेवा सुधारणा यामध्ये मोठी प्रगती करण्यात आली आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महसूल वाढ, स्वयंचलित प्रक्रिया,



पारदर्शकता आणि नागरिकांचा सहभाग वाढवणे यावर भर देण्यात आला आहे.

डिजिटल पेमेंट आणि पारदर्शक व्यवहार प्रणाली यामुळे महसूलात वाढ झाली आहे. कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप कमी करून प्रत्यक्ष सेवा जलद गतीने देता याव्या यासाठी स्वयंचलित प्रक्रीयेचा अवलंब करण्यात येत आहे. सर्व सेवा एका क्लिकवर उपलब्ध करून देऊन अर्ज करणे आणि सेवा प्राप्त करून घेणे हे सहज आणि सुलभ झाले. व्यवस्थापकीय निर्णयांची अचूकता आणि परिणामकारकता वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर.

पुरस्कार स्वीकारताना महापालिका आयुक्त डॉ.इंदूराणी जाखड यांनी सांगितले की, "हा पुरस्कार केडीएमसीच्या टीमच्या अथक परिश्रमांचे प्रतीक आहे. डिजिटल गव्हर्नन्स आणि स्मार्ट सेवांच्या मदतीने आम्ही शहरातील नागरिकांना उत्तम सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत. भविष्यातही या प्रवासात सातत्य ठेवू." या सन्मानामुळे केडीएमसीच्या नवीन तंत्रज्ञानावर आधारित सेवा आणि प्रशासकीय सुधारणा यांना राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. हा पुरस्कार केडीएमसीच्या सर्व अधिकाऱ्यांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी अभिमानाचा क्षण आहे.

# नववर्ष स्वागतयात्रेत मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीसाठी भाजपा आग्रही

## – आ. निरंजन डावखरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** – शहरात मराठी नववर्षानिमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या स्वागत यात्रेत यंदाच्या वर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीसाठी भारतीय जनता पक्ष आग्रही असल्याचे दिसून येत आहे. यापूर्वी या यात्रेत फडणवीस यांनी कधीही हजेरी लावली नव्हती. परंतू, यंदा प्रथमच फडणवीस या यात्रेत सहभागी होणार असल्याची माहिति भाजपाच्या एका वरिष्ठ नेत्याने स्वागत यात्रेच्या बैठकीत दिली. त्यामुळे आता, शहरात राजकीय चर्चा रंगू लागल्या आहेत.




गुढीपाडवा आणि मराठी नववर्षानिमित्त दरवर्षी जिल्ह्यातील विविध शहरांमध्ये नववर्ष स्वागत यात्रा काढण्यात येते. ठाणे आणि डोंबिवली हे शहर सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जाते. या शहरांमध्ये मोठ्या स्वागत यात्रा निघतात. या यात्रेच्या माध्यमातून सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविण्याबरोबरच विविध सामाजिक संदेश दिले जातात. ठाणे शहरात श्रीकौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासतर्फे स्वागतयात्रेचे आयोजन केले जाते. यंदा या स्वागत यात्रेचे २५ वे वर्षे आहे. त्यामुळे न्यासातर्फे चार महिन्याआधीपासून तयारीला सुरुवात करण्यात आली आहे. सोमवारी यासंदर्भात बैठक पार पडत असून या बैठकीत शहरातील विविध संस्था सहभागी होतात.

कोणत्या संकल्पनेवर आधारित चित्ररथ साकारला जाईल याचे नियोजन या बैठकीत केले जाते. या सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या स्वागत यात्रेच्या बैठकीला आमदार निरंजन डावखरे यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी ते म्हणाले, ठाणे शहरात गेली २५ वर्षे ही यात्रा निघत आहे. ही केवळी यात्रा नसून संस्कृती, परंपरा आणि धर्माची एक चळवळ आहे. त्यामुळे या यात्रेची ही परंपरा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावी आणि त्यांनी देखील या यात्रेत सहभागी व्हावे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असा सल्लाही डावखरे यांनी आयोजकांना दिला. तसेच यंदा यात्रेचे रौप्य महोत्सवी वर्षे आहे. या यात्रेविषयी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगितले असून त्यांना या यात्रेत सहभागी होण्याची विनंती केली आहे. यासाठी फडणवीस यांनी तत्वत: मान्यता दिली असल्याचे भाजपचे आमदार निरंजन डावखरे यांनी सांगितले.

# डोंबिवलीतील समर्थ इमारत जमीनदोस्त करा – उच्च न्यायालय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली पूर्व आयरे भागातील टावरीपाडा येथील समर्थ कॉम्पलेक्स ही सात माळ्याची बेकायदा इमारत तोडण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. ६५ महारेरा प्रकरणातील ही इमारत आहे. आणि एका जमीन मालकाचा या बेकायदा इमारतीच्या जागेवरील हक्क डावलून या इमारतीची उभारणी करण्यात आली आहे. या जमीन मालकाने याप्रकरणी उच्च न्यायालयात याचिका केली होती. या याचिकेवर निर्णय देताना उच्च न्यायालयाने समर्थ कॉम्पलेक्स ही बेकायदा इमारत जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले.



त्यामुळे ६५ महारेरा प्रकरणात या बेकायदा इमारतीवर कारवाई होणारच होती. आता बबन केणे या जमीन मालकाच्या याचिकेवर निर्णय देताना न्यायालयाने समर्थ कॉम्पलेक्स इमारत जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले. या बेकायदा इमारतीत ६० कुटुंब राहतात.

वनराज आंदेकर खून प्रकरणात २१ आरोपींविरुद्ध आरोपपत्र-प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या जबाबासह तांत्रिक पुराव्यांची जोड

कल्याण डोंबिवली पालिकेच्या बनावट बांधकाम परवानग्या, या बनावट कागदपत्रांच्या आधारे महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून समर्थ कॉम्पलेक्स या बेकायदा इमारतीची उभारणी केल्यामुळे पालिकेच्या नगररचना विभागातील उपअभियंता प्रसाद सखदेव यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलिसांनी तीन वर्षांपूर्वी समर्थ डेव्हलपर्सचे भागीदार सखाराम मंगल्या केणे आणि अक्षय अशोक सोलकर , वास्तुविशारद मे. वास्तुरचना यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेली माहिती अशी, की आयरेतील टावरीपाडा येथे उभारलेली समर्थ कॉम्पलेक्स या जमिनीची मालकी बबन केणे, सखाराम केणे, इतर यांच्या भाविकीची आहे. ही इमारत उभारताना बबन केणे यांची नावे सात बारा उताऱ्यावरून काढून टाकण्यात आली. त्यांचा या जमिनीवरील वारसा हक्क विकासकाकडून डावलण्यात आला. ३२ ग ची ही जमीन आहे. याप्रकरणी कल्याण न्यायालयात दावा सुरू आहे. सात बारा उताऱ्यावरील नावे कमी करणे, इमारत उभारणीसाठी अकृषिक जमीन परवाना हा सर्व प्रकार नियमबाह्य असल्याने याप्रकरणी जमीन मालक बबन केणे पालिका, शासन अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. त्याची दखल घेण्यात आली नाही. बबन केणे यांनी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

> आयरेतील समर्थ कॉम्पलेक्स बेकायदा इमारत ६५ महारेरा प्रकरणातील आहे. याप्रकरणात एका जमीन मालकाच्या याचिकेवरून न्यायालयाने या इमारतीवर कारवाईचे आदेश दिले आहेत. पोलीस बंदोबस्तात योग्य नियोजन करून या इमारतीवर कारवाईचे नियोजन केले आहे.
> – प्रसाद बोरकर,
> उपायुक्त
>
> ————————————
>
> समर्थ कॉम्पलेक्स इमारतीसंदर्भात कोणत्याही न्यायालयाचा मनाई हुकूम नाही. त्यामुळे ही इमारत तोडण्याचा पालिकेचा मार्ग मोकळा आहे.
> ॲड. सचिन कुलकर्णी,
> पालिका सल्लागार वकील.

या याचिकेची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने स्वामी समर्थ इमारत बनावट कागदपत्रांच्या आधारे, जमीन मालकाचा हक्क डावलून उभारण्यात आली असल्याने ही इमारत जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले आहेत.




# मेट्रो सर्वेक्षण – अभियंत्यांना धक्काबुक्की

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाण्यात मेट्रो निर्माणाचे काम घोडबंदर भागात सुरू आहे. या सर्वेक्षणासाठी गेलेल्या अभियंत्यांना कावेसर भागात धक्काबुक्की आणि मारहाण झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. ठाण्यातील घोडबंदर भागात मेट्रो निर्माणाचे काम सुरू आहे. ही मेट्रो वडाळा-घाटकोपर-घोडबंदर येथील कासारवडवली- अशी वाहतुक करणार आहे.

कासारवडवलीपुढे गायमुख पर्यंत या मेट्रोचा विस्तार करण्यात आला आहे. मेट्रोचे बांधकाम, सर्वेक्षण असा वेगवेगळ्या कंपन्यांना याचा ठेका देण्यात आला आहे. घोडबंदर भागात काही ठिकाणी मेट्रोचे खांब उभारले गेले आहेत. तर काही ठिकाणी गर्डर बसविण्याचे काम सुरू आहे. मागील सहा ते सात वर्षांपासून सुरू असलेल्या या कामांमुळे घोडबंदरच्या मार्गिका अरुंद झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना येथे वाहतुक कोंडीचा फटका बसत असतो. या मेट्रोसाठी घोडबंदर भागात सर्वेक्षण सुरू असते.

सोमवारी महामेट्रोचा ठेका मिळालेले कंपनीचे सहा अभियंते कावेसर येथील तारांगण इमारतीजवळ सर्वेक्षण करत होते. सोमवारी सायंकाळी पाच वाजता सर्वेक्षण सुरू असताना, मोठ्याप्रमाणात येथे जमाव जमला होता. या जमावातील सहाजण पुढे येऊन ही जमीन आमची आहे येथे सर्वेक्षण करु नका असे अभियंत्यांना सांगू लागले. त्यानंतर त्यांनी यातील काही अभियंत्यांना धक्काबुक्की करत मारहाण केली. तसेच सर्वेक्षणाची यंत्रणा देखील तोडली. हे यंत्र शेतकऱ्यांच्या जमीनीवर सर्वेक्षण करताना आमच्याकडूनच तुटले असेही त्या अभियंत्यांकडून एका कागदावर लिहून घेण्यात आले. काही वेळानंतर जमाव तेथून निघून गेला. त्यानंतर तेथे कासारवडवली पोलीस ठाण्याचे कर्मचारी आले. अभियंत्यांना कासारवडवली पोलीस ठाण्यात नेऊन तक्रार दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी आता कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# पनवेल , नवीमुंबई महापालिकेचा संयुक्त सीसीटीव्ही प्रकल्प

## नियंत्रण कक्षासाठी दोन्ही महापालिका करणार आठ कोटी खर्च




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** बेलापूर येथील नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये नवी मुंबई शहर, पनवेल महापालिका क्षेत्र यामधील सर्वच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियंत्रण असणार आहे. हा नियंत्रण कक्ष उभारण्याच्या कामाला वेग आला असून पनवेल महापालिका या नियंत्रण कक्षाचे बांधकाम करणार आहे तर नवी मुंबई महापालिका या कक्षातील अंतर्गत साहित्याचा पुरवठा करणार आहे. दोन्ही महापालिका या नियंत्रण कक्षासाठी सुमारे आठ कोटी रुपये खर्च करणार आहेत.

या नियंत्रण कक्षामध्ये डेटा सेंटर आणि कमांड सेंटरची तरतूद नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिद भारंबे यांनी केली आहे. नवी मुंबईत होणाऱ्या रस्त्यावरील गुन्हेगारांना या नियंत्रण कक्षातून पकडण्यात मोठी मदत भविष्यातील तपास यंत्रणेला मिळणार आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाला विस्ताराचे वेध लागले असले तरी सुमारे ३५ लाख लोकसंख्येच्या पोलीस आयुक्तालयात सुरक्षेसाठी अवघे साडेपाच हजार पोलीस तैनात आहेत. आधुनिक युगातील गुन्हेगारसुद्धा आधुनिक पद्धत अवलंबत असल्याने नवी मुंबई सर्वत्र सीसीटीव्हीचे जाळे पसरुन पोलीस आयुक्तालयाच्या एका कार्यालयातून संपूर्ण शहरावर लक्ष ठेवण्यासाठी तिसरा डोळ्याला अधिक सक्षम करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी कंबर कसली आहे. मागील अनेक वर्षात स्वतःचे हक्काचे सीसीटीव्ही नियंत्रण केंद्र नवी मुंबई पोलीस उभारु शकले नाहीत.

> या केंद्रातून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्वच सीसीटीव्ही कॅमेरे पोलीसांच्या नियंत्रणाखाली येतील. तसेच येथे डेटासेंटर व कमांड सेंटर असल्याने २४ तास पोलिसांची त्यावर नजर असेल. पुढील काही महिन्यात हे केंद्र सुरू करण्यासाठीचे नवी मुंबई पोलीस दलाचे प्रयत्न सुरू आहेत.
> – अजयकुमार लांडगे,
> सहाय्यक पोलीस आयुक्त,
> नवी मुंबई गुन्हे अन्वेषण विभाग

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिद भारंबे यांनी हक्काचे नियंत्रण कक्ष सुरू करण्यासाठी नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त कैलास शिंदे आणि पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्यासमोर सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, डेटासेंटर व कांड सेंटरची नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये संयुक्तपणे सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावाला दोन्ही महापालिकांच्या आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे बेलापूर येथील पोलीस आयुक्तालयाच्या प्रवेशद्वारासमोरील उजव्या बाजूच्या मोकळ्या भूखंडावर सुमारे साडेपाच हजार चौरस फुटाची एक मजली इमारत उभारुन त्यामध्ये अद्यायावत नियंत्रण कक्ष सुरू करण्याचे आरेखन बनविण्यात आले. या नियंत्रण कक्षाची एक मजली इमारत पनवेल महापालिका बांधून देणार आहे. या बांधकामासाठी पनवेल महापालिका सूमारे २ कोटी १३ लाख ९८ हजार रुपयांचा खर्च कऱणार असून या कामाची निविदा पनवेल महापालिकेने शनिवारी (ता.१५) जाहीर केली. तसेच ही इमारत बांधल्यानंतर या इमारतीमध्ये लागणाऱ्या अत्याधुनिक यंत्र सामुग्रीसाठी नवी मुंबई महापालिकेने साडेपाच कोटी रुपयांचा खर्च करण्याची तयारी दर्शविल्यामुळे पुढील काही महिन्यात हे डेटासेंटर उभे राहील यासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत.

नवी मुंबई महापालिका प्रशासनाने काही वर्षांपूर्वी शहरात सीसीटीव्ही कॅमेरांचे जाळे उभारल्याने नवी मुंबई शहर सर्वात सुरक्षित शहर अशी घोषणा केली होती. मात्र नवी मुंबई महापालिका आयुक्तांना सध्या याच कॅमेरांची देखभालीसाठीच्या सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# बारावीची परिक्षा तोतया विद्यार्थ्याला अटक


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई- १२ वी परिक्षा देण्यासाठी आलेल्या एका तोतया 'विद्यार्थ्याला' पेल्हार पोलिसांनी अटक केली आहे. अहमद खान असे या तोतया विद्यार्थ्याचे नाव आहे. नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार येथील एका परिक्षा केंद्रात हा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे ज्या अरबाझ कुरेशी या विद्यार्थ्यासाठी तो परिक्षा देण्यासाठी आला होता तो राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या विद्यार्थी सेनेचा अंबरनाथशहर प्रमुख आहे.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षांना ११ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली आहे. सोमवारी भौतिकशास्त्र विषयाचा पेपर होता. अंबरनाथ शहरातील काही तोतया विद्यार्थी नालासोपारा येथील परिक्षा केंद्रावर परिक्षा देण्यासाठी येत असल्याची माहिती मनसेच्या कार्यकर्त्यांना मिळाली होती. त्यानुसार दुपारी त्यांनी संशयित विद्यार्थ्याचा पाठलाग केला. हा विद्यार्थी पेल्हार येथील ओम साई छाया ज्युनिअर कॉलेज मधील परिक्षा केंद्रावर आला. कार्यकर्त्यांनी त्याची माहिती परिक्षा केंद्र प्रमुखांना दिली. हा तरुण तोतया असल्याचे निष्पन्न झाले. त्याचे नाव अहमद खान असून तो अरबाझ कुरेशी या विद्यार्थ्यांचा पेपर सोडविण्यासाठी आला होता. याबाबत पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. पोलिसांनी अहमद खान याला ताब्यात घेतले. त्याच्यावर गुन्हा दाखल कऱण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पेल्हार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप राख यांनी दिली.

# शिवजयंती निमित्त भिवंडी महापालिकेची 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

● भिवंडी प्रतिनिधी

दि.१९ फेब्रुवारी २०२५ छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त "जय शिवाजी जय भारत" पदयात्रा कार्यक्रमाचे आयोजनशासनाच्या परिपत्रकानुसार व श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त यांच्या आदेशानुसार दि.१९ फ़ेब्रुवारी २०२५ छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त "जय शिवाजी जय भारत" पदयात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम सकाळी. ७.०० वा होणार आहे. त्यानंतर नझराना सर्कल येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम होणार आहे.

तद्नंतर केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम मंत्रालयाच्या निर्देशानुसार "जय शिवाजी जय भारत" पदयात्रा सकाळी. ०७.३० वाजता चाचा नेहरु हायस्कुल, भिवंडी येथुन सुरु होणार असून त्याचा समारोप समारंभ सकाळी. ९.३० वाजता तेथेच आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होणायाचे आवाहन प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी केले आहे.

# शिवजयंती निमित्ताने अनाथालयाला जीवनावश्यक वस्तू वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
कल्याण : मंगळवार दि.१८ फेब्रुवारी २०२५ रोजी ३९५ व्या शिवजयंतीनिमित्ताने सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती, ठाणे जिल्हयाच्यावतीने जीवन संवर्धन फाऊंडेशन संचालित बेघर अनाथ मुलांची शाळा, म्हसकल तालुका कल्याण येथे जीवनावश्यक वस्तू वाटप समितीचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी ॲड.दिनेश सासे, कार्यक्रमाचे संयोजक अमोल सुरोशी, योगेश्वर बुटेरे,शनि पवार, नम्रता ठाकरे, सुनिल शिर्के,बंडू डोंगरे, नेताजी लाटे, ज्ञानेश्वर ठाकरे, अनिल घरत, निलेश पवार,आकाश पाटील,गितांजली अहिरे,नंदन कुलकर्णी,अभयंकर सर आदीं मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवराय हे तत्कालीन अदिलशाही सरदार शहाजी महाराजांचे चिरंजीव होते त्यामुळे ते नक्कीच सरदार झाले असते परंतु सामान्य रयत सुखी समाधानी झाला नसती त्यामुळे समाजातील सर्व घटकांचा विकास म्हणजेच रयतेचे स्वराज्य असे परखड मत चेतनसिंह पवार यांनी व्यक्त केले.

स्वराज्य पुर्व काळात आपआपसांत लढून स्थानिक सरदार मृत्युमुखी पडत व बाहेरील शासक राज्य करत परंतु जिजाऊ मॉंसाहेबांनी सदरची परिस्थितीची जाणीव शिवरायांना करुन दिल्यामुळे सर्व बहुजन मावळे एकत्रित करुन स्वराज्य केल्याचे प्रतिपादन योगेश्वर बुटेरे यांनी व्यक्त केले तसेच गुरूकुल शाळेतील विद्यार्थी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपले मनोगत व पोवाडे सादर केले .सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती, ठाणे जिल्हयाच्या वतीने मागील आठ वर्षापासुन लोकउपयोगी व लोकप्रबोधनाचे कार्यक्रम कल्याण तालुक्यात जिल्हाध्यक्ष चेतनसिंह पवार व तालुका संयोजक अमोल सुरोशी राबवत असल्याचे मत ॲड.दिनेश सासे यांनी व्यक्त केले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कल्याण तालुका संयोजक अमोल सुरोशी यांनी मेहनत घेतली तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अमोल सुरोशी यांनी केले व आभार प्रदर्शन आकाश पाटील यांनी केले.

# ठाण्यात विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
मुंबईतील श्री विश्वकर्मा प्रति उन्नती मंडळ (सेवाभावी कार्यरत संघटना , विदर्भ-महाराष्ट्र ) आयोजित विश्वकर्मा जयंती महोत्सव काल ब्राह्मण सभागृह, ठाणे येथे अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने खात- वाडी (लोहार - सुतार) समाज बांधव आणि विश्वकर्मा समाजाचे मान्यवर उपस्थित होते. या भव्य सोहळ्याचे आयोजन यशस्वी करण्यासाठी श्री. चंद्रकांत बावणे (अध्यक्ष), श्री. मंगेश शहारे, श्री. दिनेश शिंदे, श्री. प्रवीण बांगडे, श्री. विष्णूजी शेंडे, श्री. मुरलीधर सतीबावणे, श्री. प्रशांत बांगडे, श्री. ज्ञानेश्वर ठमके तसेच सौ. विना शहारे, सौ. मनीषा शिंदे, सौ. माधुरी शिंदे, सौ. रोशनी बांगडे, सौ. ज्योसना बांगडे यांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. त्यांच्या नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

जयंती महोत्सवाची सुरुवात भगवान विश्वकर्मा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर धार्मिक विधी, पारंपरिक कीर्तन, भजन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि कला सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख मान्यवरांनी भगवान विश्वकर्मांचे कार्य, त्यांचे वास्तुशास्त्र व तंत्रज्ञानातील योगदान यावर विचार मांडले. मुंबईतील विविध विश्वकर्मा मंडळांचे प्रतिनिधी आणि समाजातील मान्यवर सदस्य या सोहळयासाठी उपस्थित होते. समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये लोकमत ऑनलाइन कंटेंट रायटर आणि प्रसिद्ध अँकर शैला गोपाळराव गेडाम यांचा विशेष सत्कार करण्यात आला. लोहार समाजातील महिला अँकर म्हणून त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात आपल्या मेहनतीने स्वतःची ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच, शैला गेडाम यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन करत समाजाच्या प्रगतीसाठी विशेष महिलांच्या शिक्षण आणि प्रगतीसाठी भर द्यावा, असा मोलाचा सल्ला दिला.

श्री विश्वकर्मा प्रति उन्नती मंडळ, मुंबई यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि समाजाच्या सहकार्याने हा सोहळा अत्यंत यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मंडळातील सर्व सदस्य, सहकर्मी आणि स्वयंसेवक आणि लोहार समाज बांधवांची उपस्थिती होती.

# उल्हास नदी पूर नियंत्रण रेषा बाधितांना दिलासा मिळणार

बदलापूर: नवीन विकास नियंत्रण नियमावलीत पूर रेषेत कुठे बांधकाम करता येईल याबाबत काही नियमावली तयार करता येईल. यापूर्वी कोल्हापुरमध्ये ते यशस्वी झाले आहे, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी काळात उल्हासनदी पूर नियंत्रण रेषेमुळे बाधित झालेल्या नागरिकांना दिलासा मिळणार असल्याचे संकेत दिले आहेत.

बदलापूर पश्चिमेकडील उल्हास नदी जवळ बदलापूर गावाच्या वेशीवर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयाचे मंगळवारी (ता.१८) राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. याप्रसंगी खासदार बाळयामामा म्हात्रे, आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी,विधान परिषद आमदार निरंजन डावखरे, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हाधिकारी, अशोक शिनगारे, पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे, मुख्याधिकारी मारुती गायकवाड, भाजपा जिल्हाध्यक्ष जितेंद्र टाकी आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे व मनोगत व्यक्त करताना आमदार किसन कथोरे यांनी बदलापूरला एमएमआरडीएकडून निधीबाबत सापत्नभावाची वागणूक मिळत असल्याने मोठमोठे प्रकल्प रखडले असल्याची खंत व्यक्त केली. तसेच उल्हासनदीच्या पूर नियंत्रण रेषेमुळे लाखो नागरिक बाधित असल्याची कैफियत मांडून यातून दिलासा देण्याबाबत निर्णय घेण्याची मागणी केली. हा धागा पकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापुरच्या धर्तीवर दिलासा देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे संकेत दिले. ते पुढे म्हणाले की, उल्हास नदीवर आपण काही धरण देखील बांधतो आहोत, ही धरणे बांधल्यानंतर आपोआप पूररेषा कमी होणार आहे. त्यातून या भागाला दिलासा मिळेल. उल्हास नदीतील गाळ काढून खोलीकरण करण्याचे काम हाती घेण्यात येईल. त्याचबरोबर उल्हासनदित जे घाण पाणी, सांडपाणी नाले जात असतील ते शोधून ते स्वच्छ केले जाईल. उल्हास नदी खोरे ही कोकणातील सर्वात मोठे खोरे असून मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. त्याचे योग्य नियोजन करणे व निर्मळ बनवणे ही काळाची गरज असल्याचे मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा जिवंत आहे, ते छत्रपती शिवाजी महाराजांमुळे त्यामुळे बदलापुरातील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा म्हणजे तुम्हा आम्हासाठी प्रेरणास्थान असून त्यापासून प्रेरणा घेऊन आपण पुढे वाटचाल करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

*एमएमआरडीएचा निधी इथपर्यंत येईल याचा मार्ग आपण निश्चितपणे मोकळा करू अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पाणीपुरवठा योजनेबाबत उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून नगरविकास विभागामार्फत पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मेट्रो १४ हा प्रकल्पाला चालना देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. बदलापूरच्या स्वतंत्र महानगर पालिकेच्या मागणीबाबत मात्र त्यांनी बोलण्याचे टाळले.*

## मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

*कथोरे योग्य वेळी मंत्री होतील आमदार किसन कथोरे मंत्र्यापेक्षा कमी आहेत का? मंत्री करू शकत नाहीत ते काम कथोरे करीत आहेत. आणि प्रत्यक्ष मुख्यमंत्री त्यांच्या पाठीशी आहे, ते मुख्यमंत्रीच आहेत. त्यामुळे चिंता करण्याची गरज नाही. योग्य वेळी ते मंत्रीही होतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.*

# राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

रायगड : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यात दि.22 मार्च 2025 रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल अ. शिंदे यांनी दिली आहे.या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली, दिवाणी आणि तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रकरणे तसेच ग्रामपंचायतीच्या घरपट्टी व पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकारणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्थांच्या थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात. दि.22 मार्च 2025 रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि अधिकाधिक नागरिकांनी या लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड, अलिबाग ए. एस. राजदेकर यांनी केले आहे.

# दिनेश गुप्ता यांचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : कल्याण बेतुरकर पाडा येथील रहिवासी प्रा. डॉ. दिनेश गुप्ता यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जगातील सर्वात लहान चित्र (9mm x 9mm ) बनवले असल्याचा दावा त्यांनी केला आहे. एका मिनिटापेक्षा कमी वेळात हा विश्वविक्रम करून त्यांनी शिवरायांना आदरांजली वाहिली. याआधीही, अभियंता प्रो. दिनेश गुप्ता यांचे नाव गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आणि लिम्का वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदले गेले आहे. प्रो. दिनेश गुप्ता यांची प्रेरणा 'प्रत्येक कणात शिवराय' या थीमवर आधारित आहे, ज्यामध्ये त्यांनी त्यांच्या कलेने ऐतिहासिक योगदान दिले आहे. हे यश शिवाजी महाराजांप्रती त्यांची अढळ भक्ती आणि समर्पण दर्शवते. त्यांच्या कार्यामुळे समाजात ऐतिहासिक जाणीव वाढेल.




# आंतरराष्ट्रीय स्तरावर शिवरायांना मानवंदना



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / मुरबाड : महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यामधील कल्याण तालुक्यातील कोळीवली गावातील कुस्तीपटु कै बळीराम महादू कारभारी यांचा सुपुत्र तसेच ठाणे जिल्हा कयाकिंग व कनोईंग असोसिएशन सचिव आणि ठाणे जिल्हा साहसी खेळ संघटनेचे अध्यक्ष अजित कारभारी यांनी ब्रिगेडियर. सौरभ सिंह शेखावत (नि.) यांच्या प्रोहस्ताहनाने रशिया मधील एरोग्लॅड कोलम्ना येथे - ३६°C तापमानामध्ये एल ४१० या हवाई जहाजातुन ५१००मीटर (१६,७३२ फुट) आकाशात श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या ध्वज फडकवत श्री छत्रपती शिवाजी महाराजांना साहसी मानवंदना देत प्रथम भारतीय नागरिक ठरले. कर्नल कोस्त्या क्रिवोशिव (२७००० जंप मास्टर- रशियन आर्मी स्कायडाइव मुख्य प्रशिक्षक - आर्मी बेस) व आमेचे मित्र आनी यूनाइटेड स्टेट पैराशूट एसोसिएशन (अमेरिका) चे स्काईडाइविंग प्रशिक्षक राहुल देसाई (डकरे) यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचे अजित कारभारी विभागीय क्षेत्ररक्षक नागरी संरक्षण नवी मुंबई समूह ठाणे यांनी साहसी कामगिरी यशस्वीरीत्या पूर्ण केली.

*त्यांनी केलेल्याअद्वितीय कामगिरीबद्दल ठाणे जिल्हा एकविध क्रीडा महासंघाचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, कार्याध्यक्ष मुकूंद भोईर, उपाध्यक्ष मिलन वैद्य, घटना समिती आध्यक्ष श्रीराम पाटील महासचिव मालोजी भोसले आणि कोषाध्यक्ष प्रताप पगार यांनी कौतुक केले.

# आगरी शिक्षण संस्थेतर्फे गुणवंताचा सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
पेण : शैक्षणिक क्षेत्रात, अग्रेसर असलेली समाजातील मध्यवर्ती आगरी शिक्षण संस्था या संस्थेच्या माध्यमातून यंदाही आपल्या समाजातील तसेच इतर जातीधर्मातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांकरीता पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभ संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. जे.एल. म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली पेण तालुका आगरी समाज विकास मंच पेण येथे १६ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला असून या प्रमुख पाहुणे आमदार रवींद्र पाटील माजी जिल्हा परिषद अध्यक्षा ॲड.निलिमाताई पाटील पेण तालुका आगरी विकास मंच अध्यक्ष ॲड डी.पी.म्हात्रे एन.आर.पाटील प्रायव्हेट हायस्कूल उपप्राचार्य भांडवलकर सर माजी नगरसेवक शोमेर पेणकर यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी वियजराव गावंड अध्यक्ष ॲड. जे. एल. म्हात्रे (कार्याध्यक्ष) हरिभाऊ पाटील (उपाध्यक्ष) ॲड. अच्युत पाटील (कोषाध्यक्ष) ॲड.पी.सी.पाटील विश्वस्थ ॲड. नामदेव डाऊरकर, विश्वस्थ केसरीनाथ घरत रविंद्र पाटील सहसचिव ॲड.प्रविण पाटील जे. डी. तांडेल सुदाम माळी जयवंत तांडेल दिलीप भोईर अभय पाटील अनिल पाटील अविनाश खाडे आदी उपस्थित होते.

यावेळी दिपप्रज्वलन करून श्रीफळ वाढवून सुरूवात करण्यात आली.रायगड जिल्ह्यातील पेण पनवेल अलिबाग रोहा महाड यासह अन्य तालुक्यातील दहावी व बारावी तसेच इतर शैक्षणिक पदवी घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह प्रशास्तीपत्रक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.आमदार रविंद्र पाटील निलिमा पाटील व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन त्यांच्या गुणांचे कौतुक केले व भविष्यात यशाची शिखरे पादाक्रांत करण्याचे सांगितले.अच्युत पाटील यांनी सुत्रसंचलन केले.

# 'छावा' चित्रपट करमुक्त करा'

## – आ. सौ सुलभाताई गायकवाड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
कल्याण : स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमी जीवनावर आधारित 'छावा' हा ऐतिहासिक चित्रपट १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग, आणि स्वराज्यासाठी केलेल्या अद्वितीय बलिदानाची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा महत्वपूर्ण प्रयत्न करण्यात आला आहे.


छत्रपती संभाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून, तो देशभक्तीची जाणीव जागृत करणारा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. त्यामुळे हा चित्रपट अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे.

तथापि, चित्रपटगृहांमध्ये लागू असलेल्या करांमुळे सर्वसामान्य नागरिकांना हा ऐतिहासिक चित्रपट पाहणे कठीण होत आहे. जर 'छावा' चित्रपट करमुक्त (टॅक्स फ्री) केला गेला, तर जनसामान्यांपर्यंत हा प्रेरणादायी इतिहास सहज पोहोचू शकेल. विशेषतः युवा पिढीला छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय कार्याची जाणीव होईल आणि त्यांच्या विचारांशी त्यांची नाळ जुळेल.

या पार्श्वभूमीवर माननीय आमदार सौ सुलभाताई गणपत गायकवाड यांच्यातर्फे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व माननीय सांस्कृतिक मंत्री श्री. आशिष शेलार यांना निवेदन देण्यात आले असून, 'छावा' चित्रपट तातडीने करमुक्त करावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. हा चित्रपट करमुक्त केल्यास महाराष्ट्रातील जनतेला आपल्या इतिहासाची जाणीव होईल आणि छत्रपती संभाजी महाराजांचे महान कार्य नव्या पिढीपर्यंत सुलभतेने पोहोचेल.

# मामणोलीच्या जंगलात बिबटयाचा वावर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
कल्याण : कल्याण तालुक्यातील मामणोली च्या जंगलात बिबट्या चा वावर असून नागरिकांनी सावधानता बाळगा असे आवाहन वन विभागाने केले आहे. कल्याण तालुक्यातील जंगल नष्ट होतं आहे. त्यामुळे बिबट्या व वानराचा वावर आता गावाकडे वळला आहे. मामनोली जन्गल परिसरात बिबट्या फिरत असून शेतकऱ्यांनी आपली गुरे ढोरे सांभाळून बाहेर काढावीत असे आवाहन वन विभागाने केले आहे.



# दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ सोहळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
शहापूर ग्रामिण : श्री गावदेवी शिक्षण संस्था खडवली या शाळेतील इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

शैक्षणिक वर्ष 2024- 2025 या वर्षात इयत्ता दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विद्यार्थ्यांनी आलेल्या मान्यवर पाहुण्यांचे शाळ व ग्रीटिंग कार्ड देऊन यथोचित स्वागत केले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी शाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तर उपस्थित मान्यवरांनी परीक्षेची तयारी व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्यांना फराळाचे वाटप केले.

या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे संचालक,खजिनदार शंकर चौधरी, शाळेचे मुख्याध्यापक दीपक चव्हाण, सैनिकी विद्यालय प्राचार्य महेश भावसार, गंगा गोरजेश्वर विद्यामंदिर फळेगाव मुख्याध्यापक विजय भामरे, अनुदानित आदिवासी आश्रमशाळा गोठेघर- वाफे मुख्याध्यापक शैलेश धोडी आदिजण उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दीपक चव्हाण यांनी, सूत्रसंचालन शिक्षक महेंद्र चंदे यांनी केले. तर यासाठी शाळेचे शिक्षक -शिक्षिकेतर, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले होते.

# गोवेली रेवतीच्या सरपंचांचा गोव्यात सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
कल्याण : कल्याण तालुक्यातील गोवेली रेवती ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती पूजा दिपक जाधव यांना इमेज इंटरनॅशनल रिसर्च असोसिएशन, गोवा, राष्ट्रीय सरपंच संघटना नवी दिल्ली, आणि बाबू जगजीवनराम कला, संस्कृती व साहित्य अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, त्यामुळे त्यांचे सर्व स्थरातून अभिनंदन होत आहे. गोवा राज्यातील कला संस्कृती विभाग, संस्कृती भवन पाटो गोवा येथे ९वे जागतिक युवा प्रतिमा परिषद आणि पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. (पणजी). इमेज इंटरनॅशनल रिसर्च असोसिएशन,गोवा, राष्ट्रीय प्रमुख सरपंच संघटना,नवी दिल्ली, बाबू जगजीवन राम कला,



संस्कृती आणि साहित्य अकादमी, दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गौरवशाली सन्मान सोहळा विविध क्षेत्रातील सद्गुणी आणि प्रतिभावान व्यक्ती आणि संघटनांचे प्रभावी आंदोलन उत्कृष्ट प्रदर्शनासाठी.१६ फेब्रुवारी २०२५ रोजी, कला आणि संस्कृती विभाग. संस्कृती भवन, पाटो पणजी येथे पार पडला यामध्ये कल्याण तालुक्यातील गोवेली रेवती ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती पूजा दिपक जाधव यांचा सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ देऊन .प्रा.डॉ. सुनील गायकवाड, माजी.खासदार (लातूर) लोकसभा यांच्या हस्ते गौरविण्यात आले पणजी गोव्यातील सांस्कृतिक कार्यक्रम, पुरस्कार वितरण सोहळयाकरीता चंद्रकांत कवळेकर, गोव्याचे माजी उपमुख्यमंत्री यांच्या सह डॉ. संदीप खोचर, ज्योतिषी, प्रेरक वक्ता, मुंबई, डॉ. बी. एन. खरात, संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रा. गोरख साठे सचिव, बी.जे. आर.के.एस.एसए. महाराष्ट्र डॉ. प्रा.डॉ. सुनील गायकवाड, माजी.खासदार (लातूर) लोकसभा डॉ. झाकीर खान, चित्रपट अभिनेते, मुंबई डॉ. प्रथमेश विकास अबनावे, राहुल मारोतराव उके, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा गोवा प्रभारी राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघ तथा अमरावती सह-संयोजक देवानंद कांबळे, समन्वयक ,आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेत नवनियुक्त उमेदवारांना नियुक्ती पत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
ठाणे : सरळ सेवा भरती-२०२३ अंतर्गत आरोग्य व सामान्य प्रशासन विभागात सरळ सेवा भरतीने निवड झालेल्या १९ उमेदवारांना दि. १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी सरळ सेवा भरती अंतर्गत निवड झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन केले. तर या प्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी उपस्थित उमेदवारांचे अभिनंदन करून उत्तम कामकाज करण्याबाबत शुभेच्छा दिल्या.

आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (महिला) ०७ पद, आरोग्य सेवक (पुरुष) ०७ पद तर सामान्य



प्रशासन विभागातील कनिष्ठ सहाय्यक ०५ पद अशा एकूण १९ नव नियुक्त उमेदवारांना आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, कार्यकारी अभियंता (बाधंकाम) संदिप चव्हाण, कार्यकारी अभियंता (लघुपाठबंधारे) दिलीप जोकार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समिर तोडणकर, जिल्हा समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे तसेच जिल्हा परिषदेतील सर्व अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत गट -क सरळ सेवा भरती करण्यासाठी दि. ५ ऑगस्ट, २०२३ रोजी विविध संवर्गातील २५५ पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. आयबीपीएस या संस्थेद्वारे सदर परिक्षा घेण्यात आली असून गुणवत्तेनुसार निवड करण्यात आली. सर्व संवर्गाचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. इतर प्रतिक्षा यादीवरील पात्र उमेदवारांचे कागदपत्रे पडताळणी सुरू असून लवकरच प्रतिक्षा यादीवरील निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024